
MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात




बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१०८ | शुक्रवार दि.०३ जानेवारी २०२५ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -108 | FRIDAY DT.03 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# पेठ बीड पोलीस ठाण्याची आर्थिक नाडी म्हणजे हनुमंत उगले पि आय अशोक मुदीराजानी एस पी साहेबांना उत्तर द्यावं ?

## पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकदा एसपी नवनीत कॉवत यानी अचानक चक्कर मारावी सर्व दिसून येईल ?






**वाळू, मुरूम, दारू, दोनशे टिप्पर १०० ट्रॅक्टर कत्तली साठी ने आणि करणाऱ्या जनावरांच्या गाड्यासह अनेक माफियांचे हप्ते वसुलीची जिम्मेदारी पेठ बीड पोलिसांनी हनुमंत उगले ला दिली ?**

**अनेक वेळा वादग्रस्त व वेगवेगळ्या चौकशीचा ससेमिरा लागलेला असताना सुद्धा राजकीय वरदहस्त लाभल्यामुळे पेठ बीड पोलीस ठाणेच का ?**

**पेठ बीड पोलीस ठाण्यात वादग्रस्त कर्मचारी हनुमंत उगलेला राजकीय वरदहस्त आहे का अनेक तक्रारी असताना सुद्धा हनुमंत उगलेला बीड पोलीस ठाणेच का ?**

**पेठ बीड पोलीस ठाणे येथील बार्शी नाक्यावरील चौकी नावालाच ?**

**बार्शी नाका पोलीस चौकीच्या हाकेच्या अंतरावर व चौकीच्या बाजूलाच गुटखा मटका पत्त्याचे क्लबचा विळखा घालून बसलेलेमाफीया. ?**

**हनुमंत उगले ने मनोरुग्ण अल्पवयीन मुलीवरील बलात्कारातील आरोपीही सोडून दिल्याचा ठपका तत्कालीन पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी केली होती कारवाई ?**

**राजकीय वरदहस्त लाभलेल्या वाल्मीक करारांकडून तत्कालीन एसपी अविनाश बारगळ यांच्यावर दबाव आणला होता एका पत्रकाराच्या मध्यस्थीने म्हणून तर तत्कालीन एसपी अविनाश बारगळ यांनी केली होती रद्द ?**

**हप्ते गोळा करून ते कोणाला देतो हनुमंत उगले कडून एकदा झाडाझडती एस पी नवनीत कॉवत यांनी घ्यावी जनतेची मागणी ?**

**वाळू, मुरूम, गुटखा मटका सोरट पत्त्याचे क्लब अवैध ताडीसह दोन नंबरच्या माफीयांशी लागेबांधे हनुमंत उगले वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुदिराज यांच्या मर्जीतील कर्मचारी ?**

**बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेबांकडून एकच अपेक्षा पेठ बीड ठाण्यातील वसुली करणाऱ्या पोलिसांची एकदा झाडाझडती घ्यावी ?**

**बाहेर जिल्ह्यातून बीड जिल्ह्यासह अनेक गावातून येणारे कत्तलीसाठी जनावरांची तस्करी करणाऱ्यांशी हनुमंत उगले चे लागेबांधे ?**

**पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोणत्याही प्रकरणात वसुलीसाठी हनुमंत उगलेच का ?**

**पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीमध्ये वादग्रस्त पोलीस कर्मचारी हनुमंत उगले वसुलीसाठी योग्यच का व कोणाच्या आशीर्वादाने कोणाच्या इच्छेप्रमाणे चांगला कर्मचारी म्हणून मेडल ?**

**पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत हप्तेवसुली कोणासाठी ते पाहने गरजे ?**

**अवैध वाळू मुरूम वाहतुकीची हप्त्याची जिम्मेदारी ही हनुमंत उगले वरच का ?**

**पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीत अनेक दारू अड्डे यांचीही वसुली हनुमंत उगले कडेच ?**

**पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीत अवैध ताडी विक्री व त्याचे हप्ते हनुमंत उगले कडेच का ?**

**पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन नंबरचा माफिया बोकाळला ?**

**पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीत गांधीनगर म्हणजे बीडचा बिहार**

बीड /प्रतिनिधी

बीड शहरातील पेठ बीड पोलीस ठाण्याच्या गांधीनगर बीडमध्ये पत्त्याचे क्लब मटक्याचे अंडे अवैध दारू ऑनलाइन बिंगो चक्री वाळू मुरूम हातभट्टी अवैद्य ताडीसह अनेक दोन नंबरचे माफिया राजरोसपणे धिंगाणा घालत आहेत याच पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीमध्ये मात्र आता जनतेने फक्त बघ्याची भूमिका घेतली आहे. तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करावा लागत असतानाच मात्र आता नव्याने बीड जिल्ह्यामध्ये आपली एन्ट्री केलेले एकमेव बीड जिल्ह्यातील जनतेच्या मनातील अधिराज्य गाजवणारे नवनिर्वाचित पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत साहेब यांच्याकडून पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीमध्ये अनेक दोन नंबरच्या धंद्यांना पोसण्यासाठी माफियांचा आका हा एसपींना आदेश करत होता. परंतु आता नव्याने दाखल झालेले पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब यांच्याकडून आता बीड जिल्ह्यातील जनतेला अपेक्षा वाटू लागले आहेत. त्यांनी आल्याबरोबर तर अनेक माफीयांची कंबरडे मोडण्यास सुरुवात केलेली आहे. आणि नवनिर्वाचित पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या इंट्री मुळे आता बीड जिल्ह्यातील जनता खूपच खुशआहे. त्यामुळे आता पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीमध्ये जनावराची तस्करी करणारे मटक्या चा धंदा करणारे अवैध दारू, विकणारे, अवैध ताडी, विकणारे, पत्त्याचे क्लब, ऑनलाइन बिंगो चक्री, गुडगुडी, सोरट सह व्याज बट्ट्याने पैसे देणारे सावकार या सर्वांना आता चाप बसणार आहे. याचाच एक भाग म्हणून पेठ बीड पोलीस ठाणे येथे मात्र जुनेच पोलीस कर्मचारी जे के अनेक प्रकरणांमध्ये वादग्रस्त आहेत. अशांना पुन्हा पोलीस स्टेशन पेठ का हवा आहे. तर या ठिकाणी अनेक माफीयांच्या संपर्कात असलेल्या अनेक दिवसांपासून स्वतःचे खिसे भरण्यासाठी पेठ बीड पोलीस ठाणे हे महत्त्वाचे आहे कारण या हद्दीमध्ये मर्जीतील अधिकारी मर्जीतील कर्मचाऱ्यांना पेठ बीड पोलीस ठाण्याचे आर्थिक चे कनेक्शन हप्ते वसुलीसाठी जबाबदारी देतात यामध्ये प्रामुख्याने पाहिले तर हनुमंत उगले हा पोलीस निरीक्षक अशोक मुदिराजाचा लाडकाच म्हणावा लागेल हनुमंत उगले हा बीड शहरातील पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीतील कत्तलखान्यातील येणाऱ्या जनावरांच्या गाड्यांचे हप्ते असेल किंवा वाळू मुरूम माफी यांचे कलेक्शन असेल दारू माफीयांचे कलेक्शन असेल किंवा कुठलीही तडजोड जरी असेल तरी त्या साठी फक्त हनुमंत उगले नावाचाच कर्मचारी पोलीस निरीक्षक अशोक मुदिराजांना का लागतो असा सवाल या ठिकाणी बीडची जनता करत आहे. पोलीस हनुमंत उगले ने बीड शहरांमध्ये आपला जम बसवला असतानाच मात्र पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीमध्ये हनुमंत उगले हा वादग्रस्त आहेत कथित मनोरुग्न अल्पवयीन मुलीवरील बलात्कार प्रकरणासह अनेक प्रकरणांमध्ये हनुमंत उगले हा वादग्रस्त कर्मचारी ठरलेला आहे. पेठ बीड पोलीस ठाण्यातील कर्मचारी सीनियर असेल किंवा ज्युनिअर यांना अरेरावीची भाषा करणारा व आपले राजकीय वरदहस्त लाभलेला हनुमंत उगले हा पि आय, डीवायएसपी, खिशात घेऊन फिरणारा हनुमंत उगलेला मात्र नेमका कलेक्शन साठी हप्ते खोरे साठी व पैसा गोळा करण्यासाठी कोणी ठेवले आहे. का तर हनुमान उगले ने जमा केलेल्या कलेक्शन हप्ता चे पैसे नेमके कोणाला जातात हे मात्र कळू शकत नाही. त्यामुळे बीडच्या एलसीबीच्या पथकाने कारवाई केली बीड एलसीबी चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शेख उस्मान यांच्या कर्मचाऱ्यांनी पेठ पोलीस ठाणे हद्दीतील मोमीनपुरा भागांमध्ये कत्तली साठी आणलेल्या गाईंची व कत्तल केलेल्या गाईच्या मासाचे तुकडे जप्त करून पेठ बीड पोलीस ठाण्यामध्ये संबंधित आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला परंतु त्या ठिकाणी पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीमध्ये मात्र ही कारवाई करण्याचा अधिकार पेठ पोलिसांना जास्त आहे. पेठ बीड पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी हनुमंत उगले च्या आर्थिक व्यवहारामुळे व जनावरांच्या गाड्या सोडणाऱ्या हनुमंत उगले व वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक मुदी राज यांना दिसले नसेल का असा सवाल या ठिकाणी पेठ बीडच्या नागरिकांच्या वतीने करण्यात येत आहे.पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीमध्ये अनेक खून दरोडा चोरी विनयभंग सह हाणामाऱ्यांच्या भांडणातील व दारू मटका पत्त्याचे क्लब मटका यासह अनेक गुन्हयातील आरोपी आजही मोकाट आहेत. पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीमध्ये अनेक गुन्हयामध्ये आरोपी हे पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांच्या समोर गेले तरी त्यांना का जाब विचारत नसतील तर याचे एकमेव कारण म्हणजे हनुमंत उगले हा पेठ बीड पोलिस ठाण्याची आर्थिक नाडी चालवणारा पोलीस कर्मचारी या सर्वांच्या संपर्कात आहे. त्यामुळे त्याचे सर्व कॉल डिटेल तपासणी गरजेचे आहे अशी ही मागणी पेठ बीड मधील जनतेकडून होत आहे. पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकदा एस पी नवनीत कॉवत साहेबानी चक्कर मारावीच अशी मागणी जनतेतून होत आहे ?

## पेठ बीड पोलीसाना जे दिसले नाही ते बीड एल सी बी ला दिसले कसे ?

### पेठ बीड हद्दीत कुरेशी मोहल्ला येथील कत्तलखान्यावरही मारला छापा

३१ डिसेंबर २०२४ रोजी स्थागुशा बीड येथील पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे व त्यांचे पथक पो.स्टे. पेट बीड हद्दीत अवैध धंद्याची गोपनिय माहिती काढत असतांना पोह/ वाघ यांना गोपनिय माहिती मिळाली की, मासुम कॉलनी कुरेशी मोहल्ला पेठ बीड येथे - एका पत्र्याचे शेडमध्ये गायी कापण्यासाठी बांधलेल्या आहे. अशी खात्री लायक बातमी - मिळाल्यावरुन सदर बातमी एल सी बीचे वरिष्ठ पोनि श्री. उस्मान शेख यांना कळवून त्यांनी छापा कारवाई - करण्याचे आदेश दिल्याने पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे व स्थामुशा पथक बातमी ठिकाणी - जावुन अचानक छापा टाकुन सदर ठिकाणी दोन इसम नामे १) एजाज वाहेद कुरेशी - वय ३२, २) साहिल वाजेद कुरेशी वय २२ दोन्ही रा. कुरेशी मोहल्ला मासुम कॉलनी पेठ बीड हे गोवंशीय मासाचे तुकडे करत असतांना मिळून आले व त्यांचे बाजुला चार गायी व एक कारवड बेकायदेशीरपणे कृर्तेने व निर्दयीपणे कत्तल करण्याचे उद्देशाने विना चारापाणी करता बांधलेले मिळुन आले आहे. कत्तल केलेले गोमांस व चार गायी, एक कारवड असा एकुण १,६९,०००/- रु मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दोन आरोपी विरुध्द पो.स्टे. पेठ बीड येथे महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम कलम ५.५ (ब),५ (क).९,९ (अ) प्रमाणे गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे. ही



कारवाई खरं जर पाहिलं तर पेठ बीड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांनी करणे गरजेचे आहे परंतु त्या ठिकाणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक बीड एल सी बी चे प्रमुख श्री शेख उस्मान साहेब व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी केलेली आहे. परंतु पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीतील कारवाई करण्यासाठी पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांच्या कडून ही कारवाई करण्यात आलेले नाही. तर संबंधित कारवाई ही पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीतील कर्मचारी हनुमंत उगले नावाचा पोलीस कर्मचारी संबंधित पोलीस ठाण्याच्या अवैध कत्तली साठी ने आण करणाऱ्या जनावरांच्या गाड्यांची वसुली करण्यामध्ये हनुमंत उगले हाव्यस्त आहेत त्यामुळे पेठ बीड पोलीस ठाण्याच्या आर्थिक नाडी ही अवैध कत्तल खाणे चालवणाऱ्या लोकांशी जोडलेली आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षक यांनी याप्रकरणी लक्ष घालणे गरजेचे आहे. व वादग्रस्त पोलीस कर्मचारी हनुमंत उगले ही चौकशी होणे गरजेचे आहे. हनुमंत उगले हा वादग्रस्त कर्मचारी असल्यामुळे त्याच्या वरती तडकाफडकी ने कारवाई करत त्याना पेठ पोलीस ठाण्यातून कार्यमुक्त करण्यात यावं असेही पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अनेक नागरिकांची मागणी आहे.

# जिल्हा क्रीडा पुरस्कार सन २०१९-२० साठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

बीड :- क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे अतंर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड मार्फत जिल्हयातील गुणवंत क्रीडापटु गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचे / योगदानाचे मुल्यमापन होउन त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने शासनातर्फे २०१९-२० करीता जिल्हा क्रीडा पुरस्कार नियम, २०१७ नुसार जिल्हयातील ०१ गुणवंत क्रीडा मार्गदर्शक, गुणवंत खेळाडू ( ०१ पुरूष ०१ महिला व ०१ दिव्यांग खेळाडू ) व ०१ गुणवंत क्रीडा कार्यकर्ता असे एकुण ०५ पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

सन २०१९-२० च्या जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी दिनांक ०१ जुलै २०१८ ते ३० जून २०१९ या कालावधीसाठी खेळाडूची मागील पाच वर्षाची कामगिरी व क्रीडा मार्गदर्शकासाठी मागील दहा वर्षाची कामगिरी विचारात घेतली जाईल.

गुणवंत खेळाडू

१. खेळाडूने पुरस्कार वर्षासह लगतपुर्व ०५ ( पाच ) वर्षापैकी ०२ ( दोन ) वर्षे त्या जिल्हयाचे मान्यता प्राप्त खेळाच्या अधिकृत स्पर्धेमध्ये प्रतिनिधीत्व केले असले पाहिजे.

२. खेळाडूंची मान्यताप्राप्त खेळांच्या अधिकृत राज्य / राष्ट्रीय अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेमधील पुरस्कार वर्षांच्या लगतपूर्व ०५ ( पाच ) वर्षातील राज्य व राष्ट्रीयस्तरावरील वरिष्ठ / कनिष्ठ राष्ट्रीय स्पर्धा, शालेय व केंद्र शासनामार्फत आयोजित क्रीडा स्पर्धा मधील राष्ट्रीय स्तरावरील कामगिरी लक्षात घेण्यात येईल व यापैकी उत्कृष्ट ठरणाऱ्या ०३ ( तीन ) वर्षाच्या कामगिरीचा विचार गुणांकण कोष्ठकामध्ये करण्यात येईल. ३. खेळाडूने स्पर्धांच्या मुळ प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती सोबत सादर करणे आवश्यक राहील.४. खेळाडूंचा अर्ज अधिकृत जिल्हा संघटने मार्फत सिफारस करून सादर करून आवश्यक राहील तथापि अपवादात्मक परिस्थीतीत खेळाडू वैयक्तीकरित्या अर्ज सादर करू शकतील.५. एशियन गेम्स्, कॉमनवेल्थ गेम्स्, जागतीक अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा ( सर्व गट ), जागतीक चषक क्रीडा स्पर्धा ( सर्व गट ), आशियाई अजिंक्यपद स्पर्धा ( सर्व गट ), राष्ट्रकुल अजिंक्यपद स्पर्धा ( सर्व गट ), युथ ऑलिंपीक गेम्स्, युथ कॉमनवेल्थ गेम्स्, युथ जागतिक आजिंक्यपद / युथ जागतिक चषक स्पर्धा इत्यादी स्पर्धेत सहभागी खेळाडूस २०१९-२० करीता जिल्हा क्रीडा पुरस्कार थेट देण्यात येईल. गुणवंत क्रीडा मार्गदर्शक १. क्रीडा मार्गदर्शक म्हणून सतत दहा वर्ष महाराष्ट्र राज्यात क्रीडा मार्गदर्शनाचे कार्य केलेले असले पाहिजे व त्याने पुरस्कार वितरीत करण्यात येणाऱ्या सन २०१९-२० वर्षात वयाची ३० वर्षे पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे.

२. क्रीडा मार्गदर्शकासाठी गेल्या दहा वर्षात किमान वरीष्ठ गटातील राज्य व राष्ट्रीय पदक विजेते तसेच कनिष्ठ शालेय, ग्रामीण व महिला ( खेलो इंडिया ) मधील राज्य ते राष्ट्रीयस्तरापर्यंतचे पदकविजेते खेळाडू तयार केले असतील असे क्रीडा मार्गदर्शक अर्ज करण्यास पात्र राहतील.




३. सांघिक अथवा वैयक्तीक मान्यता प्राप्त क्रीडा प्रकारात नॅशनल गेम्स, वरीष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत प्रतिनिधीत्व केलेल खेळाडू अथवा राज्य / जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम तीन क्रमांकापर्यंत यश मिळविणारे किमान तीन खेळाडू घडविणारा मार्गदर्शक पात्र असेल. क) गुणवंत क्रीडा संघटक / कार्यकर्ता :-

क्रीडा संघटक / कार्यकर्त्याने सतत १० ( दहा ) वर्षे महाराष्ट्रात क्रीडा विकासासाठी भरीव योगदान दिलेले असावे व त्याने वयाची ३० वर्षे पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे. गुणांकनांकरिता बीड जिल्ह्यातील कामगिरी ग्राह्य धरली जाईल.

१) विकासात्मक कार्य :- संघटक / कार्यकर्ते यांच्या सक्रीय प्रयत्नातून बीड जिल्ह्यात उभारण्यात आलेल्या अधिकृत खेळांची मैदाने, व्यायामशाळा, क्रीडा संस्था, संघटना स्थापन करणे तसेच राष्ट्रीय, राज्य, विभागीय, जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा भरविणे व अर्जदाराची त्यात कोणती जबाबदारी होती हे पुराव्यासह यादी सादर करावी लागेल.

२) संघटनात्मक कार्य :- दि.३० जून २०१९ पूर्वी लगतपूर्व १० वर्षात किती अधिकृत खेळाच्या एकविध जिल्हा व राज्यस्तरीय संघटनेवर पदाधिकारी आहेत, त्या पदांची जबाबदारी व केलेल्या कामाची माहिती व कार्यरत असलेल्या संघटनेत लगतपूर्व १० वर्षात किती खेळाडूंनी जिल्हा / राज्य / राष्ट्रीय पातळीवर पदके संपादन केली अशा खेळाडूंची संबधित खेळाच्या संघटनेच्या अध्यक्ष / सचिव यांच्या स्वाक्षरीसह यादी. राज्य / राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय खुल्या गटाच्या अजिंक्यपद स्पर्धांच्या निवड समितीचे सदस्य / पंच / सामनाधिकारी / वेळाधिकारी / गुणलेखक व व्यवस्थापक म्हणून केलेल्या कामगिरीचे प्रमाणपत्रे साक्षांकीत प्रतीसह सादर करावीत.३) क्रीडा प्रचार व प्रसार :- क्रीडा विषयक लिखाण , वक्तव्य, संशोधनात्मक कार्य, क्रीडा परिसंवाद, चर्चासत्राचे आयोजन, प्रात्यक्षिके, चित्रपट, प्रदर्शन इ. माध्यमातून प्रसारीत केलेले कार्य व क्रीडा विषयक स्वतंत्र लिखाण / पुस्तके / मासिके / साप्ताहिके अथवा दैनिके यातील क्रीडा विकास विषयक लेख ( समालोचनात्मक नव्हे ) आकाशवाणी अथवा दूरदर्श अथवा अन्यत्र केलेले भाषण , क्रीडा विषयक चर्चासत्रे आणि परिसंवादाचे आयोजन किंवा सहभाग याही बाबी पुरस्कारासाठी विचारात घेतल्या जातील. विहित नमुण्यातील अर्ज मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. विहीत नमुन्यातील अर्ज कार्यालयाच्या फलकावर लावण्यात आला आहे. बीड जिल्हयातील पात्र असलेल्या क्रीडापटुंनी उपरोक्त पुरस्कारासाठी परिपुर्ण अर्ज दि. १० जानेवारी २०२५ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

## शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्त करा, स्वाभिमानी शेतकरी संघटनेची मागणी :-शेख खिजर जैनोदीन

तलवडा ।प्रतिनिधी

सवाभिमानी शेतकरी संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक पुणे येथे २५ डिसेंबरला संपन्न झाली. या बैठकीमध्ये महायुतीने निवडणुकीच्या काळामध्ये जे आश्वासन दिले होते आपल्या जाहीरनाम्याच्या द्वारे ते आश्वासन म्हणजे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून सातबारा कोरा करू याची आठवण करून देण्याचं ठरलं. मागच्या पाच वर्षांमध्ये केंद्र सरकारचं व राज्य सरकारचं शेतीविषयक धोरण राहील आहे विशेषता तांदूळ, कापूस, सोयाबीन, कांदा, डाळी व साखर या पिकासंदर्भातलं आयात निर्यात धोरणामुळे शेतकरी पार रसातळाला गेलेला आहे उत्पादन खर्चा पेक्षा कमी किमतीला आपला शेतीमाल विकावा लागला आहे तशातच दुष्काळात तेरावा महिना यावा या पद्धतीने रासायनिक खताचे प्रचंड भाव वाढलेले आहे, औषधाचे सुद्धा भाव वाढलेले आहे त्यामुळे उत्पादन खर्च प्रचंड वाढलेला आहे.सरकार हमीभाव जाहीर करतो पण हमीभावाचा कायदा अस्तित्वात नसल्यामुळे हमीभावापेक्षा कमी किमतीमध्ये शेतकऱ्यांना आपला शेतीमाल विकावा लागतो. परिणामी गेल्या पाच वर्षांमध्ये शेतकऱ्याचं कर्ज हे दुप्पट झालेला आहे एका बाजूला केंद्र सरकार देशातल्या कार्पोरेट क्षेत्रांमधल्या उद्योगपतीचं दहा लाख कोटी रुपयेचं कर्ज निर्लेखित म्हणजेच राईटअप करतो म्हणजे सोडून देतो. हे स्वतः अर्थमंत्री लोकसभेमध्ये सांगतात आणि दुसऱ्या बाजूला शेतकर्याचे कर्ज दुप्पट होतं हे अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे आणि म्हणून आता महायुतीला महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी भरभरून मत दिलेली आहे महायुतीचे नेते हे प्रभू रामचंद्राचे भक्त आहेत एक वचनी सत्य वचनी रामचंद्र होते तेव्हा त्यांनी आपला शब्द पाळावा व शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा हे निवेदन सरकारला आठवण म्हणून देण्यात येत आहे. यावर्षीच्या बजेटमध्ये जर काय कर्जमाफीची तरतूद केली गेली नाही तर मग मात्र जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यामध्ये जी राज्यकारणीची बैठक होणार आहे त्या बैठकीमध्ये मात्र मोठ्या आंदोलनाची घोषणा होणार आहे त्यावेळी मात्र आम्ही सरकारला सडो की पडो करून सोडल्याशिवाय राहणार नाही याची सरकारने दखल घ्यावी . आज जिल्हाधिकारी साहेब बीड यांना निवेदन देण्यात आले यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उपयुवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर, जिल्हाध्यक्ष राजू गायके, युवा जिल्हाध्यक्ष दिनकर रिंगणे, तालुकाध्यक्ष विलास खिसाडे ,जयदेव शिंगणे व श्रीनिवास भोसले हे यावेळी उपस्थित होते.

## राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता प्रगती अभियानासाठी

# जास्तीत जास्त विभागांनी प्रस्ताव सादर करावेत-उपजिल्हाधिकारी शैलेश सुर्यवंशी

बीड :-कार्यालयाने केलेल्या कामाचे मुल्यमापन होण्यासाठी व नाविन्यतापूर्ण अभियान राबविल्याचा गौरव होण्यासाठी शासनाने आपल्यास राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियानातुन संधी उपलब्ध करुन दिली असून या अभियानातून बक्षिस प्राप्त होण्यासाठी जास्तीत जास्त कार्यालयाने राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धेसाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासनाचे) शैलेश सुर्यवंशी यांनी आज राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान बैठकी प्रसंगी केले.

शासन दरबारी काम करत असतांना आपल्या कोणत्याच कामाची शासनस्तरावर दखल घेतली जात नाही असा आपला सूर असतो आपल्या बुध्दी कौशल्यातुन विविध प्रकारे कार्यालयीन कामात केलेला बदल,कामाची गतिमानता, कार्यालयाचे सुशोभिकरण, कार्यालयाची अभिमुखता यातुन आपण केलेल्या कामाचा ठसा उपटविण्यासाठी शासनाने आपणस हे अभियान उपलब्ध करुन दिले असल्याचे श्री सुयंवंशी यांनी या प्रसंगी उपस्थित अधिकारी , कर्मचारी यांना सुचित केले.

या बैठकीस तहसीलदार तेजस्विनी जाधव, होत डीवायएसपी उमाकांत दस्तुर विविध कार्यालयाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. तहसीलदार तेजस्विनी जाधव यांनी प्रस्ताविकात अभियान व स्पर्धेशी संबधित सर्व अनुषंगिक बाबींवर कार्यवाही करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल विकसित करण्यात आले असून या पोर्टलच्या संकेतस्थळाची लिंक ीिसरींळरलहळूरप.ारहरीरीहींीर.सीें.ळप

या लिंकवर ऑनलाईन प्रस्ताव सादर करावेत तसेच दि. ३/२/२०२१ च्या शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार या योजनेअंतर्गत घेण्यात येणा-या स्पधेसाठी सर्व स्तरावर प्रस्ताव स्विकारण्याची मुदत दि. १६ ते ३१ ऑक्टोबर २०२४ होती. या कालावधीत वाढ करुन दि. ५ जानेवारी २०२५ पर्यंत ऑनलाईन प्रस्ताव स्वीकारण्यास मुदतवाढ दिली आहे. स्पर्धेत सहभाग घेण्याच्या अनुषंगाने सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या सचिवांनी राज्यस्तरावर त्याचप्रमाणे विभागीय,महानगरपालिका व तालुका स्तरावर स्पर्धेचे अर्ज परिच्छेद २ मध्ये नमूद केल्यानुसार दि. ५ जानेवारी २०२५ पर्यंतच्या कालावधीत ऑनलाईन (जछडखछए) पध्दतीने भरावेत. या प्रस्तावावर शासन नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तरी इच्छुकांनी वरील मुदतीत ऑनलाईन प्रस्ताव सादर करावेत.

रविवार दि. ५ जानेवारी २०२५ रोजी आवक जावक शाखा सुरु ठेवण्यात आलेली असून ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्यात तांत्रिक अडचण येत असेल तर आवक जावक विभागात सकाळी ११ ते दुपारी १. ०० पर्यंत संपर्क साधावा किंवा विनायक भावसार यांच्याशी संपर्क साधून तांत्रिक अडचण दूर करावी. त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९०४९००११०११ यावर संपर्क साधावा.

प्रस्ताव सादर करण्याचे निकष पुढीलप्रमाणे आहेत.

कार्यालयीन व्यवस्थापननामध्ये आधुनिक संकल्पना व व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब.सेवांची गुणवत्ता, दर्जा यामधील वाढ व उपक्रमांची परिणामकारकता. लोकभिमुख्ता. ई गव्हर्नस, संसाधनांचा पर्याप्त व प्रभावी वापर. तंटा, तक्रार मुक्त कार्यालय आणि नाविण्यपूर्ण व पथदर्शी स्वरंपाच्या संकल्पना/ प्रयोग उपक्रम. अ) राज्यस्तरावरील प्रशासकीय कार्यालये तसेच इतर सर्व प्रकारांतील कार्यालयांच्या मुख्यालयांचे प्रस्ताव थेट राज्यस्तरीय निवड समितीकडे सादर करण्यात येतील. राज्यस्तरीय निवड समितीव्दारे थेट प्राप्त झालेल्या प्रस्तावांमधून तीन प्रस्तावांची निवड राज्यस्तरावरच्या पारितोषिकांसाठी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी करण्यात येईल.

ब) त्याचप्रमाणे, राज्यस्तरीय निवड समितीकडून दुसऱ्या स्त्रोतातून प्राप्त झालेल्या म्हणजे विभागीय निवड समित्यांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांमधून तीन प्रस्तावांची निवड अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी करण्यात येईल. क) मंत्रालयीन प्रशासकीय विभाग या तिसऱ्या स्रोताकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी मंत्रालयांसाठी केलेल्या निकषांच्या आधारे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी प्रस्तावांची निवड करण्यात येईल.

ड) प्रत्येक महानगरपालिकेकडून जास्तीत जास्त दोन प्रस्ताव राज्यस्तरीय निवड समितीकडे सादर करण्यात येतील. त्यापैकी राज्यस्तरीय निवड समितीव्दारे पारितोषिकांसाठी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी प्रस्तावांची निवड करण्यात येईल.अशा प्रकारे राज्यस्तरावर एकूण बारा पारितोषिकांचा विचार करण्यात येईल,

# बायको नांदायला येईना, म्हणून नवऱ्याने सुरु केले चक्क उपोषण

## गेवराई तालुक्यातील सेलू येथील विचित्र प्रकाराची सर्वत्र चर्चा..!

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : पत्नी नांदायला येत नसल्याने गेवराई तालुक्यातील सेलू येथील पतीने चक्क गावातील खंडोबा मंदिरात बुधवारी उपोषणास प्रारंभ केला आहे. तातेराव अभिमान बहिरे (रा. सेलू ता.गेवराई) असे उपोषणास बसलेल्या पतीचे नाव आहे. २००२ साली तातेराव यांचा विवाह दिंद्रुड (ता. माजलगाव) येथील हंगरगे कुटुंबीयातील लक्ष्मी हिच्याशी झाला. या दाम्पत्यास चार मुली व एक मुलगा अशी अपत्ये असून यातील एक मुलीचा विवाह देखील झाला आहे. मागील काही दिवसांपासून पती व पत्नी याच्यांत किरकोळ वाद रोजच होत असल्याने पत्नी लक्ष्मी हिला



तिच्या भावाने तीन मुली, एक मुलासह माहेरी नेले.त्यामुळे जेवणाची सोय लागत नसल्याने लोणी सोडून महिनाभरापासून तातेराव बहिरे मूळ गाव सेलू येथे आले. पत्नीला नांदायला पाठवा अशी विनवणी करुन देखील तिला पाठवत नसल्याने तातेराव बहिरे यांनी अखेर बीडचे जिल्हाधिकारी व एसपी कार्यालय गाठून पत्नी लक्ष्मी हिला मूळ गाव सेलू येथे नांदण्यास पाठवावे अशी तक्रार दाखल केली. या तक्रारीची दखल न घेतल्यास १ जानेवारीपासून उपोषणाचा इशारा देण्यात आला होता.

तातेराव बहिरे याने दिलेल्या तक्रारीची दखल घेतली नसल्याने अखेर तातेराव अभिमान बहिरे यांनी सेलू येथील भवानी मंदिराजवळील खंडोबा मंदिरात उपोषणास प्रारंभ केला आहे. दरम्यान, याबाबत तलवाडा पोलिस ठाण्यात संबधित उपोषणास बसलेल्या पतीने कसलीही तक्रार केलेली नाही, असे पोलिसांनी सांगितले. जोपर्यंत कलेक्टर व एसपी कार्यालय दखल घेणार नाहीत तोपर्यंत उपोषण सोडणार नाही असे तातेराव बहिरे याने सांगितले.प्रकरणाची तालुक्यात चर्चा अशा वेगळ्या आणि विचित्र प्रकाराची चर्चा सध्या तालुक्यात असल्याचे चित्र दिसून येत आहे.


उपोषणास बसलेले तातेराव बहिरे यांनी ग्रामपंचायत कार्यालयात लेखी परवानगी घेतली नाही. याबाबत तलवाडा पोलिस ठाणे आणि तहसील कार्यालयात माहिती देण्यात येईल.

-दीपक कच्छवा, ग्रामविकास अधिकारी, सेलू.

## मानूर येथील अखंड शिवनाम सप्ताहास उपस्थित राहण्याचे श्री गुरु मानूरकर महाराज यांचे आवाहन

शिरुरकासार(प्रशांत बाफना)

लिंगैक्य श्री ष ब्र १०८ गुरु विरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज यांचे १९ वा पुण्यस्मरण सोहळा निमित्त श्री नागनाथ देवस्थान जहागिरदार मठसंस्थान मानूर येथे अखंड शिवनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रंथराज परमरहस्य पारायण सोहळा शनिवार दिनांक ०४ जानेवारी ते दिनांक ११ जानेवारी २०२५ या कालावधीत या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे लिंगैक्य श्री गुरु गिरी शिवाचार्य महाराज मानूरकर यांनी सन २००८ पासून सर्व शिष्य सदभक्तांच्या सहभागातून सुरू केलेला अखंड शिवनाम सप्ताह प्रति वर्षीप्रमाणे यावर्षीही होणार आहे. तरी सर्व शिष्य भक्तांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून या अखंड शिवनाम सप्ताहाचा लाभ घ्यावा. मानूर येथील अखंड शिवनाम सप्ताहामध्ये दैनंदिन कार्यक्रम सकाळी ७ ते १२ सद्गुरु नागनाथ महाराज व गुरुदेवता समाधीस नित्य पूजा व लघु रुद्राभिषेक, सकाळी ९ ते ११ ग्रंथराज परमरहस्य पारायण, दुपारी ११ ते १२ आशीर्वचन, दुपारी १२.३० ते ३ प्रसाद, दु. ३ ते ४ गाथा भजन, ४ ते ५ प्रवचन,


श्री १०८ गुरुविरुपाक्ष महाराज तिर्थक्षेत्र मानुर मठ.

सायंकाळी ५ ते ७ शिवपाठ, रात्री ७ ते ९ प्रसाद, रात्री ९ ते ११ शिवकीर्तन यानंतर रात्री ११ शिवजागर.. अशाप्रकारे श्री तीर्थक्षेत्र नागनाथ देवस्थान जहागिरदार मठसंस्थान मानूरचे लिंगैक्य श्री गुरु विरूपाक्ष शिवाचार्य मानुरकर महाराज यांचे १९ वे पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त शिवनाम सप्ताहाचे आयोजन मानूर मठाचे विद्यमान मठाधिपती श्री ष ब्र १०८ गुरू विरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज व सर्व शिष्य सदभक्त व मानूर ग्रामस्थांच्या सहभागातून होत आहे. तरी जहागिरदार मठसंस्थानचे सर्व शिष्य सदभक्त व समाजाने या धार्मिक सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन श्री गुरु मानूरकर महाराज व मानूर ग्रामस्थांनी केले आहे.

# गेवराईत कृषी प्रदर्शनाची उत्सुकता शिगेला ; डोम उभारणीच्या कामाचा शुभारंभ

### सहा किलोचा कोंबडा अन् चीनचा बोकड ठरणार आकर्षण

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : किसान कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीने स्व. कृषिरत्न गणेशराव बेदरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दि.०३ ते ०७ जानेवारी दरम्यान ५ दिवशीय भव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे गेवराईच्या दसरा मैदानावर आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान शुक्रवार दि.२७ डिसेंबर रोजी दसरा मैदानावर कृषी प्रदर्शनाच्या डोम स्ट्रक्चरच्या कामाचा मान्यवरांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.

यावेळी गेवराई ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर, पोलीस उपनिरीक्षक संतोष जंजाळ, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी भुतेकर, पत्रकार मधुकर तौर, पत्रकार विनोद नरसाळे, भाऊसाहेब शिंदे, शिनुभाऊ बेदरे, राजेंद्र मोटे, पत्रकार जुनेद बागवान, सरपंच भागवत जाधव, पत्रकार विनोद पौळ, मुस्ताक राज, संभाजी जाधव सह आदी मान्यवर उपस्थित होते. भव्य असे सहा डोम या ठिकाणी उभारण्यात येत असून या अनुषंगाने भव्य कृषी प्रदर्शनात विविध कार्यक्रमाची रेलचेल असणार असून या प्रदर्शनाची सध्या जय्यत तयारी सुरु असून शेतकऱ्यांमध्ये कृषी प्रदर्शनाची उत्सुकता शिंगेला पोहोचली आहे. तर दि.०३ जानेवारी रोजी मान्यवरांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे असल्याची माहिती कृषी प्रदर्शन आयोजन समितीचे संयोजक



कृषिभूषण महेश बेदरे, प्रसिद्धी प्रमुख भागवत जाधव, विनोद पौळ यांनी दिली आहे.

सहा किलोचा कोंबडा, चीनचा बोकड ठरणार प्रदर्शनाचे आकर्षण

जिल्ह्यातील पशुपालकांना पशुधन सांभाळताना वाव मिळावा दृष्टिकोनातून यंदाच्या कृषी प्रदर्शनात बुटकी म्हैस, सहा किलो वजनाचा राजा कोंबडा, व चायनाचा बोकड पाहण्याची उत्सुकता शेतकऱ्यांना लागली आहे.

शेतकऱ्यांना दिला जाणार मोफत स्टॉल

गेवराई येथील कृषी प्रदर्शनामध्ये शेतकऱ्यांनी केलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी मोफत स्टॉल दिला जाणार असून स्वतः उत्पादित केलेल्या नाविन्यपूर्ण उद्योगाला मोफत स्टॉल दिला जाणार आहे जेणेकरून या आपल्या लघु उद्योगास चालना मिळावी या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांना मोफत स्टॉल दिला जाणार आहे.

# स्व. संतोष देशमुख हत्या प्रकरणात सीआयडी, एसआयटी व न्यायालयीन अशी तिहेरी चौकशी सुरू, तपासाला वेग - धनंजय मुंडे

## हत्येतील आरोपींना फासावर लटकवले जावे, मुंडेंची पुन्हा एकदा मागणी
## बीडच्या पालकमंत्री पदाबाबत पक्षश्रेष्ठी निर्णय घेतील – धनंजय मुंडे

**मुंबई – स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हत्येतील उर्वरित आरोपींना तातडीने अटक करून या प्रकरणाची चार्जशीट लवकरात लवकर तयार करून हे प्रकरण जलद गती न्यायालयात चालवले जावे, तसेच या घटनेतील सर्व दोषी आरोपींना फाशीची शिक्षा दिली जावी ही मागणी मी अगदी सुरुवातीपासून करत आलो आहे. या प्रकरणात आता सीआयडी, एसआयटी आणि न्यायालयीन अशी तिहेरी चौकशी सुरू असून तपासाला वेग आल्याचेही दिसत आहे, असे मत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले आहे.**

आज मंत्रिमंडळ बैठकीनंतर धनंजय मुंडे हे माध्यमांशी संवाद साधत होते. हत्येतील प्रत्येक दोषी आरोपीला फासावर



लटकवले जावे ही माझ्यासह सर्वपक्षीय नेत्यांची मागणी आहे. मात्र त्या आडून मला मंत्रिपदावर ठेवायचे नाही असे म्हणणाऱ्या जिल्ह्यातील काही नेत्यांना तसे का वाटते हे त्यांनाच विचारले पाहिजे, असेही धनंजय मुंडे यांनी एका प्रश्नाचे उत्तर देताना म्हटले आहे.

दरम्यान सीआयडी, एसआयटी आणि न्यायालयीन अशा तीन प्रकारची चौकशी सुरू असल्याने यावरती कोणत्याही राजकीय नेत्याचा कुठल्याही प्रकारचा प्रभाव पडायची काहीही सुतराम शक्यता नसते. याची जाणीव सर्वच लोकप्रतिनिधींना असायला हवी. बाकी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद कोणाला द्यायचे याबाबत आमचे नेते उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्यासह पक्षश्रेष्ठी निर्णय घेतील असेही यावेळी धनंजय मुंडे म्हणाले.




**मालीपारगावच्या सुपुत्राचा नेपाळ मध्ये डंका**
**नेपाळ येथे सुरू असलेल्या इंडियन नेपाळ इंटरनॅशनल युवा सिरीज २०२४–२५ स्पर्धेमध्ये मालीपारगाव चे सुपुत्र अनिकेत बाजीराव खंडागळे याने ४०० मीटर धावणे मध्ये गोल्ड मेडल मिळवले त्याबद्दल त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.**



## सावरगाव ते सुलेमान देवळा रस्ता असून अडचण नसून खोळंबा

आष्टी ।प्रतिनिधी

तालुक्यातील श्री क्षेत्र सावरगाव ते सुलेमान देवळा रस्ता म्हणजे खड्डे मोजा बक्षीस मिळवा अशी भयानक परिस्थिती या रस्त्याची झाली आहे परिसरातील नागरिकांना श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थानला जाण्यासाठी खड्ड्याचा सामना करत जावे लागते त्यामुळे या रस्त्याच्या कामाला कधी मुहूर्त मिळणार अशी मागणी आता ग्रामस्थांकडून होत आहे गुडघेऐवडे खड्डे गाडी कशी चालवायची असा प्रश्न वांधारकांना पडतो सावरगाव पर्यंतच्या रस्त्याने प्रवास करणे धोक्याची बनले आहे या रस्त्याच्या कामाला निधी उपलब्ध झाला आहे का नाही दोन वेळा खड्डे बुजवली तेही आठवड्यात जशी ते त्यामुळे लोकप्रतिनिधींनी या रस्त्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे या रस्त्यात वर प्रचंड मोठे मोठे खड्डे पडलेत श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव येथे दर्शनासाठी जाताना भाविकांना या खडतर रस्त्याचा सामना करावा लागतो मच्छिंद्रनाथ गडावर अमोशा पौर्णिमेला राज्यातून भाविक येत असतात त्यामुळे या रस्त्याची त्वरित दुरुस्ती करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे

# बीड जिल्ह्यातील सौर ऊर्जा व पवन ऊर्जा प्रकल्पाचा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवतानी घेतला आढावा

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सौर ऊर्जा व पवन ऊर्जा प्रकल्पाचा अहवाल व आढावा बैठक बिडचण पोलीस अधीक्षक नवनीत गावत यांनी आढावा बैठक घेतलेली आहे काही दिवसांपूर्वी केज येथे पवन चक्की प्रकार काळात वाल्मीक कराड यांच्याविरुद्ध खंडणीचा गुन्हा दाखल झालेला या अगोदर सुद्धा बीड जिल्ह्यामध्ये अनेक खंडणीचे गुन्हे हे पवनचक्कीच्या झाल्यामुळे आज रोजी दिनांक ०२/०१/२०२५ रोजी पोलीस अधीक्षक श्री. नवनित कॉंवत भा.पो.से. यांनी जिल्ह्यातील सौर ऊर्जा प्रकल्प तसेच पवन ऊर्जा प्रकल्पाचे अधीकारी यांची मिटींग हॉल, पोलीस अधीक्षक कार्यालय बीड येथे बैठक बोलावली होती. यावेळी सौर ऊर्जा प्रकल्प व पवन ऊर्जा प्रकल्पाचे अधिकारी यांनी स्थानीक राजकीय पुढारी, स्थानिक शेतकरी, यांच्याकडुन विविध कारणांसाठी अडवणूक केली जाते. तसेच प्रकल्पावरील साहीत्य जसे की, बॅटऱ्या, केबल वा इतर साहीत्याची चोरी होत असल्याच्या समस्या मांडल्या.

यावेळी पोलीस अधीक्षक श्री. नवनित कौवत भा.पो.से. यांनी सांगीतले की, जर कोणीही विनाकारण तुमची अडवणुक करुन काम बंद पाडत असेल किंवा खंडणीची मागणी करीत असेल तर तात्काळ संबंधीत पोलीस स्टेशनला जावुन तक्रार द्यावी. तसेच स्थानीक राजकीय पुढारी, गाव गुंड, स्थानीक नागरीक



कामात अडथळा आणुन खंडणीची मागणी करीत असल्यास त्यांची तक्रार पोलीस स्टेशनला द्यावी. त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्याचे आश्वासन पोलीस अधीक्षक यांनी दिले.तसेच प्रकल्पावरील साहीत्याची चोरी रोखण्यासाठी प्रकल्पाच्या आत व बाहेरील गेटवर उउढत कैमेरे बसवुन घेवुन त्याचा ॲक्सेस मोबाईमध्ये घ्यावा. त्याचप्रमाणे स्थानीक पोलीस ठाण्यांना प्रकल्प परीसरात गस्त वाढवीण्याच्या सूचना देण्यात आल्या. प्रकल्पाचे अधिकारी यांनी स्थानीक पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी व संबंधीत बीटचे अंमलदार यांचे मोबाईल क्रमांक जतन करुन काही अडचण आल्यास त्यासंबंधी तात्काळ तक्रार करावी. वेळ प्रसंगी ११२ या टोल फ्री कांकावर संपर्क करुन तक्रार नोंदवावी, पोलीसांपासुन काहीही लपवून ठेवु नये, पोलीसांकडून सर्व प्रकारचे सहकार्य केले जाईल. अशा सुचना देण्यात आल्या,

तसेच स्थानिक शेतकरी व नागरीकांकडून अधिग्रहीत जमीनींचा वाढीव मोबदल्याची मागणी करणे व स्थानिक युवकांना प्रकल्पावर नोकरी रोजगार द्यावा यासाठी अडवणूक केली जाते त्यासंबंधाने मा. जिल्हाधीकारी साहेबांशी चर्चा करुन मार्ग काढला जाईल, असे सांगुन पोलीस अधीक्षक श्री. नवनित कौवत भा.पो.से. यांनी प्रकल्पाचे अधिकारी यांना आश्वस्त केले. तसेच कोणत्याही दबावाला बळी न पडता सर्व प्रकल्पाच्या अधिकारी यांनी आपले काम करावे. कोणीही अडवणुक केल्यास तात्काळ तक्रार करावी, दोषीना कोणत्याही परीस्थीतीत सोडले जाणार नाही असे आवाहन पोलीस अधीक्षक यांनी केले आहे.सदर बैठकीस पोलीस अधीक्षक श्री. नवनित काँवत भा.पो.से., पोलीस उपनिरीक्षक श्री. सय्यद वाचक शाखा बीड तसेच जिल्ह्यातील सौर ऊर्जा प्रकल्प व पवन ऊर्जा प्रकल्पाचे अधिकारी हजर होते.

# आरोपीचा पत्ता सांगणाऱ्यांना पोलीस देणार बक्षीस!

बीड ।प्रतिनिधी

**सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी फरार असलेले सुदर्शन घुले आणि इतर दोन आरोपीचा शोध लावण्यासाठी पोलिसांनी लोकांना आवाहन केले आहे. आरोपीचा पत्ता सांगा आणि बक्षीस मिळवा असे आवाहन पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी केले आहे.**

**मसाजोग प्रकरणातील फरार आरोपींना पकडण्यात तपास यंत्रणेला अपयश येत असल्यामुळे आक्रमक मस्साजोगच्या ग्रामस्थांनी नववर्षाच्या पहिल्याच दिवशी बुधवारी सामूहिक जलसमाधी आंदोलन केले.** जवळपास हत्येला २५ दिवस उलटले तरी आरोपींना अटक होत नाही, त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण आहे.दरम्यान आरोपीला पकडण्यात पोलिसांना म्हणावे तसे यश येताना दिसत नाही. त्यामुळे पुणे पोलिसांनी आता एक अनोखी शक्कल लढवली आहे. गुंडांना पकडा आणि बक्षीस मिळवा असे जाहीर करण्यात आले आहे.

वाल्मिक कराडवर सरपंच हत्या प्रकरणाशी संबधित पवनचक्की प्रकल्पात दोन कोटी रूपये खंडणीचा गुन्हा दाखल आहे. मात्र संतोष देशमुखांच्या हत्येचा मास्टर माईंड वाल्किम कराडच असल्याचा आरोप केला जातोय. अजूनही तीन आरोपी फरार आहेत. या तिघांना अटक करण्यासाठी मस्साजोगच्या गावकऱ्यांनी जलसमाधी आंदोलन केलं. आरोपींना कधी अटक होणार याची तारीख सांगा. तुम्ही जी तारीख सांगाल तोपर्यंत आम्ही तुम्हाला एका शब्दानेही बोलणार नाही , नाहीतर आम्हाला गोळ्या घाला, असे




गावकरी म्हणाले. गावकऱ्यांचे हे आंदोलन जवळपास दोन तास सुरू होते. अखेर बीडचे नवे पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी आंदोलनकर्त्यांची समजूत काढली आणि त्यांना आंदोलन मागे घेण्यास सांगितले.

मोस्ट वॉन्टेड म्हणून जाहीर...

गावकऱ्यांचा रोष, विरोधकांचा आरोप, मुक मोर्चे, आंदोलनाने पोलिस प्रशासन खडबडून जागे झाले. आता या प्रकरणातील मुख्य तीन आरोपींना पोलिसांनी मोस्ट वॉन्टेड म्हणून घोषीत केले आहे. यामध्ये सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे, सुधीर सांगळे अशी फरार आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी प्रसिद्धपत्रक जाहीर करत आरोपींना फरार घोषित केले आहे. आरोपींची माहिती देणाऱ्याला योग्य बक्षीस देखील देणार असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमुद करण्यात आले आहे.

नाव गुप्त ठेवणार

फरार तिन्ही आरोपी सापडल्यास अधीक्षक नवनीत काँवत यांच्यासह इतर पाच अधिकाऱ्यांचे नंबर प्रसिद्ध केले आहेत. हे आरोपी कुठेही दिसून आल्यास संपर्क साधण्याचे आवाहन केज पोलिसांनी केले आहे. तसेच माहिती देणाऱ्यांचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल आणि त्याला योग्य बक्षीस देखील देण्यात येणार आहे.

# जिल्हा परिषदेसमोरील अनधिकृत अतिक्रमण तात्काळ हटवावे-शिवसंग्राम

## अनधिकृत अतिक्रमण हटवण्याबाबतचे शिवसंग्राम चालक–मालक संघटनेचे निवेदन मुख्याधिकाऱ्यांना सादर

बीड ।प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते जुनी जिल्हा परिषद पर्यंतची जागा तत्कालीन मा.जिल्हाधिकारी व मा.पोलीस अधिक्षक यांनी शिवसंग्राम चालक मालक संघटने अंतर्गत व्यवसायिकांसाठी गाड्या पार्किंगसाठी पर्यायी जागा दिलेली होती.सदरील जागेवर गेल्या अनेक दिवसापासून काही व्यक्तिंनी अनधिकृतपणे अतिक्रमण करून सदर जागा हि चुकीच्या पद्धतीने भाडयाने देऊन हॉटेल,पान टपरी, दुकानाचे भाडे ते वसुल करत आहेत. यामुळे गाडया पार्किंगसाठी दिलेल्या जागेवर अतिक्रमण केल्याने शिवसंग्राम चालक मालक संघटनेच्या अंतर्गत भाडे तत्वावर असणाऱ्या गाड्या हया रोडवर लागत आहेत. त्यामुळे रस्त्यावरील रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे वाहतूक पोलीसांकडून त्यांना नाहक त्रास होत आहे.

याबाबतीत आज शिवसंग्रामचे जिल्हा सरचिटणीस तथा शहर प्रभारी अनिल भाऊ घुमरे व शहर उपाध्यक्ष शेषराव तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसंग्राम चालक–मालक संघटनेचे पदाधिकारी व सदस्यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्रीमती नीता अंधारे यांना निवेदन सादर केले.जिल्हा परिषदेसमोरील अनधिकृत अतिक्रमणे हटवुन शिवसंग्राम चालक–मालक संघटनेच्या भाडेतत्वावर चालणाऱ्या वाहनासाठी पार्किंग व्यवस्था




उपलब्ध करून देणेबाबतची विनंती या निवेदनाद्वारे केली आहे. याबाबत तात्काळ उचित कार्यवाही अनुसरण्यात येईल असे आश्वासन मुख्याधिकारी यांनी यावेळी दिले. याप्रसंगी शिवसंग्राम चालक–मालक संघटनेचे अध्यक्ष संदीप भांबे, उपाध्यक्ष रज्जाक पठाण, मार्गदर्शक शिवाजी वाघमारे जालिंदर पाखरे, नितीन मुंडे विकास गोटे, राजेश चव्हाण,शंकर मोरे,शेख जमील रफिक काझी, बापूसाहेब पवार,संकेत पाळवदे,विनोद वडमारे,विनोद मस्के, सुनील निसर्गंध, प्रभाकर उगले, अभिमान डोंगरे, बंडू मोरे सोनू गुंजाळ, प्रकाश गायकवाड शेख नबी,अमोल सोनवणे मधुकर राऊत, उल्हास बांगर,बाबासाहेब शिंदे, यांच्यासह चालक–मालक संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केसापूर कॅम्प येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या कामावरून मुरुमाची विक्री!




## हजारो ब्रास मुरूम गुत्तेदाराकडून विक्री

माजलगाव / प्रतिनिधी

तालुक्यातील केसापुरी कॅम्प या ठिकाणी मागील एक ते दीड वर्षांपासून उपजिल्हा रुग्णालयाचे बांधकाम सुरू आहे. या रुग्णालयाच्या पाठीमागील भागातुन मोठ्या प्रमाणात खोदकाम करून हजारो ब्रास मुरूम संबंधित गुत्तेदाराकडून विनापरवाना विक्री करून या माध्यमातून लाखो रुपये कमवल्याचा आरोप या भागातील नागरिकांनी केला आहे.

माजलगाव शहरापासून जवळच असलेल्या केसापुरी कॅम्प या ठिकाणी उपजिल्हा रुग्णालयाचे काम सुरू आहे. सध्या या रुग्णालयाचे काम अर्धे झाले असून चालू असलेल्या कामाच्या पाठीमागील बाजुला काम सुरू करण्यापूर्वी येथे जेसीबी द्वारे मोठ्या प्रमाणात खोदकाम करून या ठिकाणी निघालेला मुरूम महसूल विभागाची कसल्याच प्रकारची परवानगी न घेता बिन बोभाटपणे तीन दिवसापासून विक्री केल्याचा आरोप या भागातील नागरिकांकडून केला जाऊ लागला आहे.याबाबत या भागातील नागरिकांनी संबंधित गुत्तेदार व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता यांना विचारणा केली असता हा मुरूम नसून काळी माती आहे व हे माती टाकण्यासाठी आमच्याकडे जागा शिल्लक नसल्यामुळे आम्हीही माती काही लोकांना दिल्याचे सांगू लागले होते.

घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता या ठिकाणाहून हजारो ब्रास मुरूम कामाच्या बाहेर गेला असल्याचे दिसून येऊ लागले आहे. यामुळे शासनाला करोडो रुपयाचा चुना लावण्याचे काम संबंधित गुत्तेदाराकडून केली जाऊ लागले आहे व याद्वारे लाखो रुपये गुत्तेदारांनी कमवण्याचा आरोप या भागातील नागरिकांकडून केला जाऊ लागला आहे.

# फडणवीस तुमचं पोलीस खातं भ्रष्ट झालंय!

## सरपंच देशमुख यांच्या हत्येच्या तपासावर ॲड. प्रकाश आंबेडकर संतप्त



मुंबई ।प्रतिनिधी

देवेंद्र फडणवीस तुमचं पोलीस खातं पूर्णपणे भ्रष्ट झाले आहे, हे पहिल्यांदा लक्षात घ्या. नुसत्या कमिट्या निर्माण करून उपयोग नाही, असे म्हणत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या तपासावर संताप व्यक्त केला आहे.

ड. आंबेडकर म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांचे पोलीस यंत्रणेवर अजिबात नियंत्रण नाही. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या मृत्य प्रकरणी पहिल्यांदा स्थानिक पोलिसांनी चौकशी केली. त्यांना देशमुख हत्येप्रकरणी काही सापडले नाही. त्यानंतर पोलीस अधीक्षकांनी चौकशी केली, त्यांना काही सापडले नाही. त्यानंतर उखऊ ने चौकशी केली, त्यांनाही काही सापडले नाही. आता चौकशीसाठी डखढ स्थापन केली आहे. पुढे काय करणार, तर ही केस उङ्ख ला देणार असेही ड. आंबेडकरांनी म्हटले आहे.ज्यांनी या प्रकरणाचा योग्य तपास केला नाही, त्यांना विचारा की तपास का झाला नाही, याचे उत्तर नसेल तर त्यांना सेवेतून सरळ निलंबित करा, असा सल्लाही आंबेडकरांनी फडणवीस यांना दिला आहे.

# धारूर एस टी आगाराचे सहायक कार्यशाळा अधिक्षक भारत कोमटवार सेवानिवृत्ती निमीत्त सोहळा संपन्न

धारूर / प्रतिनिधि

धारूर एस टी आगाराचे सहायक कार्यशाळा अधिक्षक भारत कोमटवार हे ३५ वर्षाचे प्रदीर्घ सेवे नंतर सेवानिवृत्त होत असल्या बद्दल धारूर आगाराचे वतीने सफत्नीक सत्कार करून त्याना सन्मान पुर्वक निरोप देण्यात आला यावेळी त्यांचे सेवा काळातील कार्याचा गौरव सर्वानी केला. धारूर एस टी आगाराचे सहायक कार्यशाळा अधिक्षक भारत कोमटवार याचे ३५ वर्षाचे प्रदीर्घ सेवे नंतर सेवानिवृत्त होत अल्या बद्दल धारूर आगार व कर्मचा-याचे वतीने सन्मान पुर्वक निरोप देण्यात आला या कायक्रमाचे अध्यक्षस्थानी आगार प्रमूख नवनाथ चौरे हे होते तर प्रमूख पाहुणे म्हणुण बीड विभागाचे यंत्र अभियंता कांडगिरे, उपयंत्र अभियंता अमोल भुसारी विभागीय




भांडार अधिक्षक पाटोळे, माजी नगरसेवक राजु कोमटवार हे उपस्थीत होते. भारत कोमटवार यांचा धारूर आगार व कर्मचा-याचे वतीने सपत्नीक सत्कार करून त्याचे ३५ वर्षा चे उत्कृष्ट व प्रामाणीक सेवेचा गौरव सर्वच वक्त्यानी केला. भारत कोमटवार यानी सत्काराला उत्तर देताना प्रामाणीक पणे सेवा कशी केली आलेले विवीध अनुभव सागीतले. सर्वाचेच आपल्याला सहकार्य मिळाल्याने आपण उत्कृष्ट सेवा करू शकलो हे सांगीतले. यावेळी अध्यक्षीय भाषणात आगारप्रमूख नवनाथ चौरे यानी दिडवर्षा पासून कोमटवार याचे सोबत काम करताना आपले काम प्रामाणीकपणे केले तर माणूस कामात यशस्वी कसा होऊ शकतो हे शिकायला मिळते असे सागून त्याचे कार्याचे कौतूक केले.

या प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी बिक्कड व मुंडे यांनी केले तर अभार आशोक मुळे यांनी केलेया वेळी मित्र परीवार नातेवाईक. यांच्या सह आगारातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्या साठी अजय सोनटक्के, बाळासाहेब सुतार, विजय चॉव्हाण, इम्रान कादरी, विनोद बरके, बालासाहेब ठोंबरे, राजमाने, व इतर कर्मचारी यानी परीश्रम घेतले

# वन्य प्राण्यांकडून सावरगाव परिसरातील पिकाचे नुकसान

**आष्टी ।प्रतिनिधी**

**तालुक्यातील सावरगाव व परिसरात रानडुकराचा उपद्रव वाढला असल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांची ज्वारी हरभरा गहू भुईमूग या पिकाचे रान डुक्कर व वन्य प्राण्याकडून मोठ्या प्रमाणात मुस्कान होत आहे या परिसरातील शेतकऱ्यांचे पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे**

गच वर्षे पावसामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले त्यात आता वन्यप्राण्यामुळे पिकाचे नुकसान होत आहे व या प्राण्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी तथा शेतकऱ्यांकडून होत आहे मोघा मालाची बिबियाने आणि खरेदी करून लोक कसेतरी पीक आणण्यासाठी प्रयत्न करतात परंतु हे रानडोके रात्री पिऊन पिकाचा सुखा साफ करतात त्यामुळे शेतकरी हैराण झाले आहेत त्यामुळे युवा कडून काहीतरी उपाययोजना करावी जेणेकरून शेतकऱ्यांची होणारे पिकाचे नुकसान होणार नाही अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते घनश्याम मस्के यांनी केली आहे

# मारफळा विद्यालयाचे वरिष्ठ लिपिक विठ्ठलराव बाबर सेवानिवृत्त रणवीरराजे पंडित यांच्या उपस्थितीत सेवापूर्ती सोहळा संपन्न

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ, गेवराई संचलित माध्यमिक विद्यालय मारफळा येथील वरिष्ठ लिपीक श्री.विठ्ठल सोपानराव बाबर हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त गुरुवार दि.२६ डिसेंबर रोजी सेवापूर्ती कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून शारदा स्पोर्ट अकॅडमीचे संचालक युवा नेते रणवीर पंडित, अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गुलाबराव कुटे, तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, मारफळा चे सरपंच शरदराव कबले , गणपत महाराज उबाळे, शिवाजी महाराज कुटे, माजी सभापती वसंतराव उबाळे, माजी उपसभापती ज्ञानोबा आबुज, प्रा.काशिनाथ गोगुले, बाजार समितीचे सदस्य नारायणराव डरपे, शाळेचे मुख्याध्यापक



बी.टी.पवार, शिवाजीराव कुटे यांच्यासह निरोप समारंभाला पंचक्रोषीतील मान्यवर व शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी युवा नेते रणवीरराजे पंडित यांच्या हस्ते संस्थेच्या वतीने सेवानिवृत्त वरिष्ठ लिपिक विठ्ठलराव बाबर यांचा सपत्नीक यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना रणवीरराजे म्हणाले की, बाबर सर यांनी त्यांच्या कार्यकाळात प्रामाणिक सेवा दिली आज ते सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचा सेवापुर्ती समारंभ ही त्यांच्या कार्याची पावती आहे. असे गौरवोद्गार याप्रसंगी त्यांनी व्यक्त करुन पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन भागवत ठोंबरे तर उपस्थितांचे शेख सर यांनी आभार व्यक्त केले. यावेळी माध्यामिक विद्यालय व वरिष्ठ महाविद्यालय, मारफळा चे सर्व शिक्षक, पालक वर्ग तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रजासत्ताक दिनाची शाळांची सुट्टी रद्द; राज्य सरकारचा मोठा निर्णय

मुंबई (प्रतिनिधी)

राज्यासह संपूर्ण देशात २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो. या दिवशी देशभरातील शालेय विद्यार्थ्यांना सकाळी झेंडावंदन केल्यानंतर सार्वजनिक सुट्टी दिली जाते. आता मात्र, यापुढे ही सुट्टी रद्द करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.शालेय शिक्षण विभागाने मंगळवारी एक परिपत्रक जारी केलं आहे. त्यामध्ये सर्व सरकारी आणि खाजगी शाळांना प्रजासत्ताक दिनी शाळेत दिवसभर देशभक्ती थीमसह विविध स्पर्धा आणि कार्यक्रमांचे आयोजन करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.



२६ जानेवारीच्या दिवशी आपल्या विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्राचा इतिहास, आपली महान संस्कृती आणि देशाचे भविष्य याबद्दल राष्ट्रीय अभिमानाची भावना निर्माण व्हावी, हा यामागचा उद्देश आहे. त्यामुळे २६ जानेवारी २०२५ पासून प्रजासत्ताक दिन सर्व माध्यमांच्या सर्व सरकारी आणि खाजगी शाळांमध्ये विविध कार्यक्रमांसह साजरा केला जाणार आहे, असे परिपत्रकात म्हटले आहे.या दिवशी कोणते कार्यक्रम घ्यावेत, यासाठी आठ स्पर्धा आणि कार्यक्रमांची यादी दिली आहे. ध्वजारोहणानंतर प्रभातफेरी, वक्तृत्व स्पर्धा, कविता स्पर्धा, नृत्य, चित्रकला, निबंध आणि क्रीडा स्पर्धा आणि प्रदर्शन यांचा समावेश केला आहे. हे सगळे कार्यक्रम देशभक्तीपर थीमवरच असावेत, असेही परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. तसेच जिल्हा शिक्षणाधिकारी आणि शिक्षण निरीक्षकांनी या निर्देशाची ठोस अंमलबजावणी करावी, असे आदेश दिले आहेत.



उपशिक्षणाधिकारी (योजना) काझी अब्दुल माजेद साहेब हे मंगळवारी ३१.१२.२०२४ रोजी सेवानिवृत्त झाले त्यानिमित्त त्यांच्या सत्कार करताना मोहम्मद इसाक , काझी मुशाहेद , मोमीन अलीमोद्दीन, मोमीन नजीब, मिर्झा हसनात, मोमीन मुजम्मील, शेख रिजवान, नजीब सौदागर

# सय्यद जावेद अली यांना द स्कूल एक्सप्रेस चा वतीने आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर

## ५ जानेवारी ला मान्यवरांचे हस्ते होणार वितरण

धारूर प्रतिनिधी

धारूर येथील मिलिया प्राथमिक शाळा चे मुख्याध्यापक श्री सय्यद जावेद अली यांना द स्कूल एक्सप्रेस च्या वतीने आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर झाला आहे.या कार्येक्रमाचे बक्षीस वितरण सोहळा दिनांक ५ जानेवारी रविवार रोजी ११ वाजता अहेमद नगर रोड येथील डॉं बाबासाहेब आंबेडकर भवन मध्ये होणार आहे.मागील १८ वर्षा



पासून ते मिलिया प्राथमिक शाळा धारूर येथे सह शिक्षक पदा वरील कार्येरत आहे. विध्यार्थ्यांना शिक्षणासाहीत इतर उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देत आहे. धारूर शहरात बहू प्रचित असे त्यांची ओळख आहे शिक्षण चे वितरिक्त शाळेत इतर सामाजिक उपक्रम राबवित आहे.

यांचा कार्यची दखल घेऊन त्यांना कोरोना काळात उत्कृष्ट कामगिरी ने प्रामाणित करण्याय आले.या सर्व कामांची दखल घेऊन बीड येथील प्रसिद्ध स्कूल एक्सप्रेस च्या वतीने त्यांना आदर्श मुख्यधयपाक पुरुस्कार जाहीर करण्यात आले.या निवड बद्दल अंजुमन ईशात ए तालीम संस्थे चे सचिव खान साबिहा बाजी, डॉं इरफान सिदिखी, मुसा खान,अमान पटेल, मुजताबा खान,काजी जैनुलाबेदिन,मोमीन फेरोज, मोहंमद वाजेद, एम ए खमर नाझ अयाज कागजी यांनी शुभेच्छा दिल्या.सय्यद जावेद सर ची निवड झाल्या बद्दल सर्व कडून त्यांची अभिनंदन केले जात आहे

# माजी उपसरपंच म्हणतो, मला डांबले तर सरपंच म्हणतो, मलाच केली मारहाण

## दोन्ही परस्परविरोधी पाटोदा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

बीड: मला कारमधून नेत खोलीत डांबले. नंतर साखळीने हातपाय बांधून कुलूप लावले. तिघेजण बाहेर जाताच आपण सुटका केल्याची फिर्याद केज तालुक्यातील माजी उपसरपंचाने दिली आहे. तर माजी सरपंचाने आपण डांबून ठेवले नसून याच उपसरपंचाने आपल्याला मारहाण केल्याची फिर्याद दिली आहे. हे दोन्ही परस्परविरोधी गुन्हे पाटोदा पोलिस ठाण्यात दाखल झाले आहेत. परंतु याचा प्राथमिक तपास करून पायाला लावलेल्या कुलपाची 'किल्ली' पोलिसांच्या हाती लागली आहे. दोन्ही तक्रारीत सगळे काही बनावट असल्याचे प्रथमदर्शनी समोर आले आहे. त्याचा अहवाल न्यायालयाला पाठविला जाणार आहे.

माजी उपसरपंच ज्ञानेश्वर इंगळे व कारेगावचे माजी सरपंच दत्तू तांदळे अशी परस्परविरोधी तक्रारदारांची नावे आहेत. मुंबईला जायचे आहे, असे सांगून पाटोदा तालुक्यात नेले. तेथे तांदळेसह तिघांनी एका खोलीत डांबले. पायाला साखळीने बांधून कुलूप लावले तर हात दोरीने बांधले. तसेच खिशातील दोन लाख रुपये व फोन पे वरून ५० हजार रुपये घेतले. हे लोक नाश्ता आणण्यासाठी बाहेर गेल्यावर आपण सुटका केली, अशी फिर्याद इंगळे यांनी दिली आहे.उसने घेतलेले अडीच लाख रुपये देतो असे म्हणून पाटोद्याला नेले. तेथे गेल्यावर फोन पे वरून ५० हजार रुपयेदिले. त्यानंतर त्यांनी मारहाण केल्याची फिर्याद तांदळे यांनी दिली पांढरे कपडे घालून समोरून गेलेइंगळे ज्या ठिकाणाहून बाहेर पडले, त्याच ठिकाणी एका व्यक्तीने त्यांना पाहिले. पांढरे कपडे घालून समोरून गेले. त्यावेळी त्यांच्या पायात काहीही नव्हते. शेतातून जात होते, असा जबाब एका प्रत्यक्षदर्शीने पोलिसांना दिला.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT